February - 2020 (5)

मिरा-भाईंदर महानगरपालिका
विधी विभाग
आवक क्र. 05 मा.अ.
दिनांक: 20/2/2020

5 रु. कोर्ट फी COURT FEE Rs.5 भारत INDIA पाँच रुपये FIVE RUPEES

5 रु. कोर्ट फी COURT FEE Rs.5 भारत INDIA पाँच रुपये FIVE RUPEES

# जोडपत्र "अ"

[नियम ३ पहा ]

**माहितीचा अधिकार अधिनियम , २००५ अन्वये माहिती मिळवण्याच्या अर्जाचा नमुना**

प्रति,
राज्य जन माहिती अधिकारी,
विधी विभाग, मिरा भाईंदर महानगर पालिका,
स्व. इंदिरा गांधी भवन , भाईंदर [पश्चिम], ता.जि. ठाणे ४०११०१.

१. **अर्जदाराचे नाव** :- प्रमोद पांडुरंग पाटील

२. **पत्ता** :- ई -६०१, होली कॉम्प्लेक्स सह.गृह.संस्था मर्यादित, थुंगा रुग्णालयाच्या शेजारी,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,मिरा रोड [पूर्व ], ठाणे ४०११०७. महाराष्ट्र , भ्रमणध्वनी :- ९८२००११३७६

३. **आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील** :-

[एक] **माहितीचा विषय** :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेतील अधिकारी / कर्मचारी यांच्यावरील भारतीय दंड संहिता, १८६० किंवा इतर कोणत्याही कायद्याच्या अंतर्गत प्रलंबित फौजदारी किंवा न्यायालयीन कारवाई / गुन्ह्यांच्या नोंदी बाबत

[दोन] **माहितीचा कालावधी** :- मिरा भाईंदर महानगरपालिका स्थापनेच्या दिनांकापासून ते 20-02-2020 पर्यंत

[तीन ] **आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन** :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेतील अधिकारी / कर्मचारी यांच्यावरील भारतीय दंड संहिता, १८६० किंवा इतर कोणत्याही कायद्याच्या अंतर्गत प्रलंबित फौजदारी किंवा न्यायालयीन कारवाई / गुन्ह्यांच्या नोंदी बाबत माहिती खालीलप्रमाणे प्राप्त व्हावी

1. फौजदारी प्रक्रिया [अधिकारी/ कर्मचाऱ्याचे नाव , पदनाम, विभागाचे नाव, गुन्ह्याचा तपशील, कारवाईची सद्य स्थिती]

   न्यायालयीन [अधिकारी/ कर्मचाऱ्याचे नाव ,पदनाम, विभागाचे नाव,गुन्ह्याचा तपशील,कारवाईची सद्य स्थिती]

2. भारतीय दंड संहिता, १८६० किंवा इतर कोणत्याही कायद्याच्या अंतर्गत फौजदारी कारवाई झालेली असल्यास प्रत्येक प्रकरणातील FIR [प्रथम माहीती अहवाल] याची तसेच न्यायालयीन प्रक्रियेतील दस्तऐवजांची छायांकित प्रत मिळावी.
3. सदर प्रकरणामध्ये महानगरपालिकेच्या वतीने खाजगी वकिलांची मदत घेण्यात आलेली असल्यास कोणत्या प्रकरणांमध्ये कोणाची मदत घेण्यात आली, त्याकरिता किती मानधन अदा करण्यात आले याची माहिती मिळावी.

Jadhav
Kee
24/2/2020

4. भारतीय दंड संहिता, १८६० **किंवा इतर कोणत्याही** कायद्याच्या **अंतर्गत फौजदारी** कारवाई झालेली असल्यास प्रत्येक प्रकरणात **विधी** विभाग, मीरा भाईंदर महानगरपालिकेने मा. आयुक्त आणि संबंधित विभागाशी कोणता पत्रव्यवहार केलेला असल्यास त्यांच्या छायांकित प्रती मिळाव्यात.

[चार] माहिती टपालाद्वारे हवी आहे कि व्यक्तीशः हवी आहे | व्यक्तीशः

[प्रत्यक्ष टपालखर्च अतिरिक्त फी मध्ये समाविष्ट करण्यात येईल ]

[पाच ] टपालाद्वारे हवी असल्यास , | ----------------

[सर्वसाधारण, नोंदणीकृत किंवा शीघ्र ]

४. अर्जदार दारिद्र्यरेषेखालील आहे किंवा कसे

[असल्यास त्याबाबतच्या पुराव्याबाबतची छायांकित प्रत जोडावी | ------------------

ठिकाण :- मिरा रोड, ठाणे

दिनांक :- 20-02-2020

अर्जदाराची सही

RIGHT TO INFORMATION

# मिरा भाईंदर महानगरपालिका

जाक्र.मनपा/विधी/मा.अ./०५/२०२०
दि. २५/०२/२०२०

**प्रति,**

**श्री. प्रमोद पाटील**
ई/६०१, होली कॉम्प्लेक्स सह गृह सं. मर्या.
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, रेमन्ड शो रुम नजीक
मिरा रोड (पुर्व) जि. ठाणे. ४०१ १०७.

**विषय :-** केंद्रशासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज.

**संदर्भ :-** आपला दि. २०/०२/२०२० रोजीचा अर्ज.

**महोदय,**

उपरोक्त संदर्भिय अर्जान्वये आपण मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेतील अधिकारी/कर्मचारी यांच्यावरील भारतीय दंड संहिता, १८६० किंवा इतर कोणत्याही कायद्याच्या अंतर्गत प्रलंबित फौजदारी किंवा न्यायालयीन कारवाई /गुन्हयांची मुद्दा क्र. १ ते ४ अन्वये माहिती अपेक्षिली आहे.

तरी आपणास कळविण्यात येते की, मनपा आस्थापनेवरील अधिकारी/ कर्मचारी यांच्याविरुद्ध दाखल झालेल्या गुन्हयांमध्ये मनपामार्फत हताळले जात नाही त्यामुळे मनपा पॅनलवरील अभियोक्त्यांची नियुक्ती केली जात नसल्यामुळे सदरची माहिती निरंक आहे.

सदरच्या माहितीने आपले समाधान न झाल्यास आपणास श्री. सुनिल लहाने, मा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त(मु), तिसरा मजला, मुख्य कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे सदरचे पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांत प्रथम अपिल दाखल करता येईल.

Sunadke
सई वडके
जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिलिंद तावडे